
## पज्ज-विभागो

# १. सुहासियाइं

शिक्षणाची जी प्रमुख उद्‌दिष्ट्ये आहेत त्यापैकीच 'नैतिक मूल्यांचा विकास' हे एक उद्‌दिष्ट होय. गुलाबाचा अर्क इवल्याशा कुपीत बसावा, तसाच विविध अनुभवांचा, ज्ञानाचा अर्क अत्यंत मोजक्या व मार्मिक शब्दांत कवी सुभाषितात सूत्रबद्‌ध करतात, त्यांनाच सुभाषित म्हणतात. सुभाषिते ही सुगंधित फुलासारखी नित्यपणे सर्वांना आल्हाददायक असतात. तसेच व्यावहारिक शहाणपणाची शिकवणूकही देणारी असतात. सुभाषितांमध्ये कल्पनांचे, विचारांचे व शब्दांचे विशेष सौंदर्य असते, त्यामुळेच ती आकर्षक बनतात. कोणत्याही भाषेतील सुवचने ही विचारांची, आचारांची संपत्तीच असते. त्यामुळे मानवी जीवनात सुभाषितांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून सुभाषितांना रत्नांचीही उपमा दिली जाते. प्राकृत साहित्यात अशी सुभाषिते विविध ग्रंथात दिसून येतात. शिवाय प्राकृत साहित्यात सुभाषितांचे काही ग्रंथ प्रसिद्‌ध आहेत. त्यामध्ये कवी हालरचित 'गाथासप्तशती' आणि जयवल्लभ रचित 'वज्जालग्गं' हे दोन ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण सुभाषितसंग्रह आहेत.



लोहाविट्ठो नरो वित्तं पासइ नेव आवयं।
दुद्‌धं पासइ मज्जारो दंडाघायं न देक्खइ।।1।।

पोत्थगत्था उ जा विज्जा, पर-हत्थ-गयं धणं।
कज्ज-काले ण समुपन्ने, न सा विज्जा न तं धणं।।2।।

गंगा पावं, ससी तावं, दालिद्दं कप्प-पायवो।
पावं, तावं च दालिद्दं नासेंति सुयणा सया।।3।।

विएसेसु धणं विज्जा, वसणेसु धणं मई।
पर-लोए धणं धम्मो, सीलं हु सव्वया धणं।।4।।

पओसे दीवगो चंदो, पच्चूसे दीवगो रवी।
तेल्लोक्के दीवगो धम्मो, सु-पुत्तो कुल-दीवगो।।5।।

सव्व-नासे समुप्पन्ने, अद्धं चयइ पंडिओ।
अद्धेण कीरए कज्जं सव्व-नासो हि दूसहो।।6।।

माया सत्तू, पिया वेरी, जेण बालो न पाढिओ।
न सोहइ सहा-मज्झे, हंस-मज्झे बगो जहा।।7।।

दुस्सीलो य सढो मित्तो, भिच्चो आणा-परम्मुहो।
स-सप्पे य गिहे वासो, मच्चू एव्व न संसओ।।8।।

सहावो नोवएसेण, तीरए काउमन्नहा।
सुतत्तं पि जलं पेच्छ, पुणो हवइ सीयलं।।9।।

सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं निरंतरं वसणे।
तं रुवं जत्थ गुणा, तं विन्नाणं जहिं धम्मो।।10।।

जं कल्ले कायव्वं, तं अज्ज चिय करेह तुरमाणा।
बहु वग्घो हि मुहुत्तो, मा अवरण्हं पडिक्खेह।।11।।

अणुचिंतिय वियागरे, मोहरिए सच्चवयणस्स पलिमंथू।
मुसाभासा निरत्थिया, अपुट्ठिओ न भासेज्जा।।12।।

## शब्दार्थ

**लोहाविट्ठ** – लोभाधीन
**आवयं** – संकट
**पोत्थगत्था** – पुस्तकात असलेली
**परहत्थगय** – दुसऱ्याच्या हातातील
**समुप्पन्नं** – उपस्थित झाल्यावर
**कप्पपायव** – कल्पवृक्ष
**पओस** – सायंकाळ
**पच्चूस** – सकाळ
**पाढिओ** – शिकवले
**सढ** – धूर्त
**आणापरम्मुह** – आज्ञा न पाळणारा
**संसअ** – संशय
**सब्भाव** – सद्भावना
**अवरण्ह** – दुपार
**पडिक्ख** – प्रतीक्षा
**जाय** – झाले

**भाए** – वाट्यास

**मुसाभासा** – खोटारडी भाषा

**मोहरिए** – वाचाळता

**पलिमंथू** – घात करणारी

## कृती

**1. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(i) सुपुत्त × ______

(ii) वेरी × ______

(iii) पच्चूस × ______

(iv) धम्म × ______

(v) सुयण × ______

(vi) दुक्ख × ______

(vii) धवल × ______

(viii) पाव × ______

**2. आकृती पूर्ण करा.**


(i) गंगा → पाप नाहीसे करते

(ii) चंद्र → ______


(iii) कल्पवृक्ष → ______

(iv) सज्जन → ______

**3. आकृती पूर्ण करा.**




**4. आकृती पूर्ण करा.**




**5. खालील शब्दांना अर्धमागधी प्रतिशब्द लिहा.**

(i) पुत्त → ______

(ii) धण → ______

(iii) माया → ______

(iv) जल → ______

(v) मुह → ______

(vi) पिया → ______

(vii) गिह → ______

(viii) पायव → ______

**6. रिकाम्या जागा भरा.**

(i) लोभाधीन मनुष्य ------- पाहतो.

(ii) गंगा, चंद्र व कल्पवृक्ष यांच्यापेक्षा ----- श्रेष्ठ आहे.

(iii) विद्या, बुद्धी व धर्म यांपेक्षा ------- चा महिमा श्रेष्ठ आहे.

(iv) ------- भाषा निरर्थक असते.

(v) जे आपल्या पुत्राला शिक्षण देत नाहीत असे मातापिता त्या मुलांचे ------- असतात.

**7. उपक्रम :**

(i) तुम्हांला आवडणाऱ्या प्राकृत सुभाषितांचा संग्रह करा.

(ii) तुम्हांला आवडणाऱ्या सुवचनांचा संग्रह करा.